# संगमेश्वर कॉलेजचे टेबल टेनिस स्पर्धेमध्ये यश

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सोलापूर महानगरपालिका आयोजित शालेय शहरस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेमध्ये संगमेश्वर कॉलेजच्या मुलींचा संघ उपविजयी व मुलांचा संघ तृतीय स्थान मिळवले.

मुलांच्या संघात समर्थ झिपरे, तानिष लवटे, महम्मदकैफ पटेल, मोहम्मदअल्ताफ शेख तर मुलींच्या संघात श्रेया मिस्किन, पालवी ढेंगळे, नालंदा बाबर यांनी यशस्वी कामगिरी बजावली.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण ,शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी , सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ .ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# फोटोओळी

टेबल टेनिस खेळाडू समवेत संस्थेच्या सचिवा ज्योती काडादी प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उप प्राचार्य प्रसाद कुंटे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ .आनंद चव्हाण ,शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. संतोष खेंडे व प्रा. विक्रांत विभूते.

